# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी विशेष सुविधा

सातारा, दि. ५ : सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वांगीण आधार देण्यासाठी मुकुल माधव फाऊंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्ला केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या ठिकाणी विविध सुविधांसह पुणे येथील केईएम रुग्णालयातील तज्ज्ञांचे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मार्गदर्शन देणार आहे. बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी माहिती मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी दिली.

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेअरच्या वितरणप्रसंगी येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, श्री. छ. सौ. दमयंतीराजे भोसले, जिल्हाधिकारी अश्विन मुद्‌गल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्याम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी सौ. पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक फारोख कूपर, सीईओ जाल कूपर, रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. परवेज ग्रँट आणि केईएम हॉस्पिटलच्या भारती पाटील उपस्थित होत्या.

सौ. छाब्रिया म्हणाल्या, या मुलांना तसेच त्यांच्या मातांना पुण्यातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व समुपदेशन केले जाणार आहे. यामुळे




सेरेब्रल पाल्सी खुर्ची वितरणप्रसंगी खा. उदयनराजे भोसले, सौ. दमयंतीराजे भोसले, सौ. रितू छाब्रिया, अश्विन मुद्‌गल, नितीन पाटील, श्याम देशपांडे, दिलीप माने व अन्य.

परिणामकारक उपचार होण्यास मदत होणार आहे. गरजू मुलांपर्यंत या सुविधा पोहोचाव्यात यासाठी दुर्गम भागातील मुलांना या केंद्रापर्यंत येण्यासाठी वाहतुकीच्या सोई पुरविण्यात जिल्हा प्रशासनाने सहकार्य करावे.

सौ. दमयंतीराजे भोसले म्हणाल्या, रितू छाब्रिया यांचे काम अंतस्थ हेतूशिवाय आणि केवळ परोपकाराच्या भावनेने गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. या उदात्त कार्यास सर्वोतोपरी सहकारी करू. डॉ. परवेझ ग्रँट यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात ५ व्हिलचेअर्स, ५ कमोड व्हिलचेअर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली. मुकुल माधव फाऊंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आतापर्यंत ७४ व्हिलचेअर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत. आणखी ३६ खुर्च्या येत्या सोमवारी जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देण्यात येणार आहेत. सल्ला केंद्रासाठी मोफत जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल रुबी हॉलचे डॉ. परवेज ग्रँट आणि डॉ. भारती पाटील, केईएम रुग्णालयाचे डॉ. आनंद पंडित यांचे सौ. छाब्रिया यांनी आभार मानले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमही झाला. त्यात सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांनी भाग घेतला. या दृश्याने सर्व उपस्थित भावूक झाले.